॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

अहिल्यानगर | रविवार, दि. २९ मार्च २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३१३ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

*** सुविचार ***
महान माणसांची
रहाणीमान साधी असतात.



निघोज येथील एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणारा अट्टल गुन्हेगार अटकेत
पान क्र. २ वर



श्रीरेणुकामाता देवस्थानात वासंतिक नवरात्रोत्सवाची सांगता
पान क्र. ३ वर



कोपरगावात राष्ट्रीय ई-परिषद; संशोधन व नवोपक्रमावर प्रभावी मंथन
पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### आता प्लास्टिकही महागले

**● नवी दिल्ली –** इराण-अमेरिका युद्धामुळे केवळ पेट्रोल-डिझेलच नाही, तर आता तुमच्या स्वयंपाकघरातील प्लास्टिकचे डबे, बादल्या आणि अगदी औषधांच्या किमतीही कडाडणार आहेत. युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे कच्च्या मालाच्या (पॉलिमर) किमतीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील कंपनी कडउछ ने २५ मार्च रोजी प्लास्टिकच्या कच्च्या मालाच्या दरात मोठी वाढ केल्याने सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार आहे. 'बिझनेस टुडे'च्या वृत्तानुसार, होमोपॉलिमर पॉलीप्रोपाईलीनच्या किमतीत प्रति टन ४,००० रुपयांची, तर कोपॉलिमर आणि पॉलीइथिलीनच्या दरात प्रति टन ७,००० रुपयांची वाढ झाली आहे. या महिन्यात तब्बल चार वेळा (१, ३, ११ आणि २५ मार्च) हे दर वाढवण्यात आले आहेत. पॉलिमरचा वापर दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंमध्ये होतो. खाद्यपदार्थ : बिस्किटे, वेफर्स आणि इतर पॅकेज्ड फूड. पेय पदार्थ : पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, ज्यूस आणि कोल्ड ड्रिंक्स. घरगुती वस्तू : प्लास्टिकच्या बादल्या, मग, टब, डबे आणि कंटेनर्स. सर्वांत धक्कादायक बाब म्हणजे, प्लास्टिक दरवाढीचा फटका आरोग्य क्षेत्रालाही बसणार आहे. 'असोसिएशन ऑफ इंडियन मेडिकल डिव्हाईस इंडस्ट्री' नुसार, होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे प्लास्टिकच्या खर्चात ५०-६० टक्के वाढ झाली आहे. यामुळे इंजेक्शनच्या सिरिंज, आयव्ही बाटल्या, डायग्नोस्टिक किट आणि औषधांचे पॅकेजिंग, सर्जिकल हातमोजे यांच्या किमती एप्रिल महिन्यापासून वाढू शकतात. तज्ज्ञांच्या मते, कंपन्या अचानक किमती वाढवण्याऐवजी उत्पादनाचे वजन किंवा आकार कमी करू शकतात. उदाहरणार्थ, १० रुपयांच्या बिस्किट पुड्याची किंमत तीच ठेवून त्यातील बिस्किटांची संख्या कमी केली जाऊ शकते.

### विदर्भ तापला, पारा ४१ अंशांवर!

**● अकोला –** राज्यात उन्हाच्या झळा अधिकच तीव्र झाल्या असून विदर्भातील महत्त्वाच्या शहरांनी ४१ अंशांचा टप्पा ओलांडला आहे. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून सूर्याचा प्रकोप वाढला आहे. विदर्भ सध्या अक्षरश: तळपत असतानाच हवामान खात्याने मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवली आहे. जोरदार वाऱ्यासह येणाऱ्या या पावसामुळे तापमानात अचानक बदल होऊन नागरिकांची तारांबळ उडण्याची शक्यता आहे. उपराजधानीत तापमान ३९ अंश असले तरी हवेतील आर्द्रतेमुळे नागरिक घामाघूम झाले आहेत. सकाळपासूनच सुरू होणाऱ्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे कठीण झाले आहे. ग्रामीण भागातील पारा ४० अंशांच्या आसपास राहिल्याने शेतीची कामे रखडली आहेत. पिकांवर उष्णतेचा ताण येत असून जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होत चालला आहे. भंडारा, गोंदिया आणि बुलढाणा परिसरात तापमान ३८ अंशांवर असले तरी उष्णतेचा प्रभाव कमी झालेला नाही. बाष्पीभवन वाढल्याने शेतातील ओलावा कमी होत असून बळीराजा संकटात सापडला आहे.

# एलपीजीला पीएनजीचा पर्याय!

## दिल्लीत बैठक, कनेक्शनसाठी अटी, शर्थी शिथिल!

**● नवी दिल्ली । वीरभूमी–**

इराण, इस्त्रायल, अमेरिका युद्धाचा परिणाम जगातील अनेक देशांवर होत आहे. भारतातही काही भागांत गॅस टंचाईचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर आता एलपीजी गॅसऐवजी पाणी कनेक्शन, वीज कनेक्शनप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनवर भर दिला जाणार आहे. कदाचित यासंदर्भात लवकरच निर्णय जाहीर केला जाऊ शकतो. दरम्यान, आज राजधानी दिल्लीत विविध राज्यांच्या पुरवठा मंत्र्यांची बैठक पार पडली. या बैठकीतही पीएनजी कनेक्शन वाढविण्याबाबत चर्चा झाली.

दरम्यान, सीएनजी आणि पीएनजी गॅस पुरवठा कसा सुरळीत करता येईल, याबाबत आज राजधानी दिल्लीत बैठक झाली. या बैठकीला सगळ्या राज्यांचे पुरवठा मंत्री आणि सचिव यांना निमंत्रण देण्यात आले होते. राज्याचे अन्न आणि पुरवठा मंत्री छगन भुजबळ या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर भुजबळ यांनी सांगितले की, मनोहरलाल खट्टर, हरदीपसिंह पुरी आणि प्रल्हाद जोशी या केंद्रीय मंत्र्यांसह इतर राज्यांमधील मंत्री बैठकीला उपस्थित होते. यावेळी पीएनजी जोडणी जास्तीत जास्त करून घेतली पाहिजे यावर त्यांनी भर दिला. पीएनजी जोडणी सक्तीची केली तरच तुम्हाला ओसी मिळेल, असे काही



करता येईल का, यावर चर्चा झाली.

पीएनजी जोडणी ताबडतोब करण्याच्या सूचना मंत्र्यांकडून देण्यात आल्या आहेत. हॉटेल आणि रेस्टॉरंट यांना तातडीने जोडणी करण्यावर भर देण्यात आला आहे. या पाइपलाइनसाठी अनेक परवानग्या मागितल्या जातात. पण त्या मिळत नसल्याने उशीर होत आहे, त्यामुळे त्या परवानग्या मागितल्यानंतर मिळाल्या, असे गृहीत धरून काम करण्यास सांगितले आहे. पीएनजी जोडणी ताबडतोब करण्यासाठी बाकी गोष्टी बाजूला ठेवा, अशाही सूचना देण्यात आल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

पाणी कनेक्शन आणि वीज कनेक्शन देण्यासाठी ज्या अटी व नियम आहेत, याप्रमाणेच पीएनजी कनेक्शन देण्याचा निर्णय घेण्यात येणार आहे. यासंदर्भात केंद्र सरकार निर्णय घेऊ शकते. आखाती देशातील युद्धामुळे एलपीजी गॅसचा मोठा तुटवडा जाणवू लागला आहे. यावर उपाय म्हणून भारत सरकार आता पीएनजीची निर्मिती वाढवत आहे. आतापर्यंत ९ लाख मेट्रिक टन पीएनजी तयार होत होता. आता ११ लाख मेट्रिक टन एवढी क्षमता वाढविण्यात आली. यासाठी राज्य सरकारने आता सर्व महानगरपालिका आणि नगरपालिकांना पीएनजी कनेक्शन देण्यासाठीच्या अटी शिथिल करण्याचे आदेश दिले आहेत.

छगन भुजबळ म्हणाले की, जिथे जिथे पीएनजी सुरू आहे, तिथे तेथील लोकांनी तातडीने पीएनजी कनेक्शन घ्यावे. असे न केल्यास ३ महिन्यांत एलपीजी कनेक्शन बंद होऊ शकते. साडेतीन हजार किलो लिटर केरोसीन महाराष्ट्राकडे आहे. जिथे पीएनजी आणि सीएनजी कमी पोहोचत आहे तिथे केरोसीन पोहोचले पाहिजे. त्याच्या वापराची परवानगी दिली आहे.

केंद्र सरकार पीएनजीच्या कनेक्शनवर भर देत आहे. जर पीएनजी मिळत असेल तर वेळीच अर्ज करावा आणि कनेक्शन घ्यावे. पीएनजीचा वापर वाढला पाहिजे. ज्या भागात पीएनजीची पाईपलाईन उपलब्ध आहे, तिथे तातडीने कनेक्शन घ्यावे अन्यथा तीन महिन्यांनंतर या भागातील एलपीजी पुरवठा बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्ज करून पीएनजीच्या जोडण्या मंजूर करुन घ्याव्यात, असे भुजबळ म्हणाले.

> **पीएनजीसाठी अटी शिथिल**
>
> हॉटेल, रेस्टॉरंट आणि लघुउद्योगांसाठी पीएनजीचा वापर वाढवणे गरजेचे असून, यामुळे खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होईल. यासाठी परवाना व जोडणी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या सूचना भुजबळ यांनी केल्या. गॅस वितरण संस्थांना आता २४ तास काम करण्याची मुभा दिली असून, कामकाजाचा हंगामही शिथिल करण्यात आला आहे.

## राष्ट्रवादी महिला प्रदेशाध्यक्षपदासाठी ५ नावे चर्चेत

**● पुणे । वीरभूमी –**

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण रुपाली चाकणकर यांना चांगलेच भोवले. या प्रकरणी रुपाली चाकणकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्याआधी त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षपद कुणाकडे जाणार याची चर्चा सुरू झाली आहे. या पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात स्पर्धा सुरू झाली आहे. ५ महिला नेत्या या पदासाठी आग्रही आहेत. त्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यापुढे हे पद कुणाकडे द्यायचे हे आव्हान आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्षपदाच्या शर्यतीत सना मलिक, सरोज अहिरे, वैशाली नागवाडे, राजलक्ष्मी भोसले आणि प्रतिभा शिंदे यांची नावे आघाडीवर आहेत. या ५ महिला नेत्यांपैकी एकाची प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती केली जाईल. यापैकी कुणाला संधी द्यायची हे मोठे आव्हान सुनेत्रा पवार यांच्यापुढे आहे. अशोक खरात प्रकरण समोर आल्यापासून रुपाली चाकणकर यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती.

विरोधकांकडून रुपाली चाकणकर यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले. त्यांनी त्यांच्या राजीनाम्यासह अटकेची मागणी केली. त्यानंतर रुपाली चाकणकर यांनी राजीनामा दिला. तेव्हापासूनच या पदासाठी चांगल्या महिला नेतृत्वाचा शोध सुरू झाला. हे महत्त्वाचे पद असल्यामुळे अनेक महिला नेत्यांनी हे पद मिळावे यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्षपदासाठी जी ५ नावे चर्चेत आहेत त्यामधील सना मलिक या आमदार आणि माजी मंत्री नवाब मलिक यांच्या कन्या आहेत. त्या अल्पसंख्याक समुदायाचे प्रतिनिधित्व करत आहेत. दुसरे नाव देवळालीच्या आमदार सरोज अहिरे याचे आहे. त्या एक अनुभवी आणि अभ्यासू नेत्या आहेत.

तिसरे नाव पुणे शहराच्या माजी महापौर आणि विद्यमान राज्य उपाध्यक्ष राजलक्ष्मी भोसले याचे आहे. चौथे नाव जळगावच्या प्रतिभा शिंदे यांचे आहे. काँग्रेसमधून नुकत्याच त्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सहभागी झाल्या आहेत. पाचवे नाव वैशाली नागवाडे यांचे आहे. त्या राष्ट्रवादीच्या खंबीर नेत्या असून पुणे जिल्ह्यात सक्रिय आहेत.

## ४ एप्रिल पर्यंत मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज

### शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना सुरक्षित ठेवावे

**● मुंबई । वीरभूमी –**

३० मार्चपासून राज्यात आभाळी हवामान आणि दुपारनंतर होणाऱ्या वादळी पावसाचे नवीन सत्र सुरू होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ३० मार्च रोजी प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरातील जिल्ह्यांमध्ये विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता आहे. उर्वरित विदर्भात देखील काही प्रमाणात हवामानात बदल दिसून येऊ शकतो.

३० मार्चच्या तुलनेत ३१ मार्च रोजी एकंदरीत वादळी पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. मात्र, या भागांमध्ये काही प्रमाणात अस्थिर हवामान आणि वादळी पाऊस पडू शकतो.

त्यानंतर १ ते ४ एप्रिल दरम्यान वादळी पावसाचे प्रमाण वाढण्याचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे या कालावधीत मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील ठिकठिकाणी आभाळी हवामान, दुपारनंतरचा वादळी पाऊस, आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या या स्थितीनुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

मेघगर्जना आणि विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे, असे आवाहन केले आहे.

> **नगर जिल्ह्यासाठी 'ऑरेंज' व 'येलो' अलर्ट; नागरिकांना सतर्कतेचे आवाहन**
>
> भारतीय हवामान खात्याने जिल्ह्यात दि. ३० व ३१ मार्च, २०२६ या कालावधीत तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळे, सोसाट्याचा वारा व गारपीटीची शक्यता व्यक्त केली असून जिल्ह्यासाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी करण्यात आला आहे. तसेच दि. १ व २ एप्रिल २०२६ या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, मध्यम पाऊस व वाऱ्याचा वेग वाढण्याची शक्यता असल्याने 'येलो अलर्ट' घोषित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

## मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतलयं

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांची अजितदादांच्या आठवणीत भावूक पोस्ट

**● बारामती । वीरभूमी –**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान अपघातामध्ये दुर्दैवी निधन झाले. आज त्यांच्या निधनाला दोन महिने पूर्ण होत आहेत. त्या निमित्त त्यांच्या आठवणीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडियावर भावूक पोस्ट केली आहे.

त्या म्हणाल्या, 'आज तुम्हाला जाऊन दोन महिने पूर्ण झाले. काळ पुढे सरकतोय, पण मन अजूनही तुमच्याच आठवणींमध्ये गुंतून राहिले आहे. प्रत्येक क्षणी तुमची उणीव प्रकर्षाने जाणवते आणि त्याचवेळी दैनंदिन राजकीय व सामाजिक कामकाजात तुमचे अस्तित्वही जाणवत राहते.

पुढे लिहिताना, 'तुमच्यातील लोकाभिमुख - विकासाभिमुख व्यक्तिमत्व, सर्वसामान्यांशी असलेली जिव्हाळ्याची नाळ, कामासाठीची झपाटलेली वृत्ती आणि प्रत्येक निर्णयामागची दूरदृष्टी हे सगळेच मला कायम मार्गदर्शन करण्याचे काम करतील. तुम्ही केवळ एक नेते नव्हता, तर असंख्य लोकांच्या आयुष्यात विश्वास, बळ आणि आशा निर्माण करणारे आधारस्तंभ होता. तुमच्यामुळे अनेकांना दिशा मिळाली, संधी मिळाली आणि स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद मिळाली.', असे देखील त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांवर चालणाऱ्या आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराची वाटचाल तुमच्या प्रेरणेनेच अखंड सुरू आहे. लोककल्याणासाठी निर्णय घेताना या परिस्थितीत तुम्ही काय केले असते, हा विचार मनात ठेवून मी प्रत्येक पाऊल उचलण्याचा प्रयत्न करते. तुमच्या अनुपस्थितीत निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, ही जाणीव मनाला कायम टोचत राहते, असा भावना त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

तुमच्या अनुपस्थितीत निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही, ही जाणीव मनाला कायम टोचत राहते. पण तुम्ही दिलेली शिकवण, तुमचे विचार आणि तुमचा वारसा हेच आता पुढचा मार्ग उजळवणारे दीप आहेत. तुमच्यासोबत घालवलेला प्रत्येक क्षण, प्रत्येक संवाद आणि प्रत्येक आठवण मनात कायमची कोरलेली आहे. तुमच्या शब्दांमधील ताकद मला उभे राहण्याची ऊर्जा देते.

दादा, तुमची उणीव शब्दांत मांडणे अशक्य आहे. पण तुमची स्वप्ने, तुमचे कार्य आणि तुमचे विचार पुढे नेण्याचा निर्धार मी कायम मनाशी जपेन. तुम्ही दाखवलेली दिशा आणि दिलेली मूल्ये हीच आमची प्रेरणा आणि मार्गदर्शक राहतील.

# अहिल्यानगर महापालिका बजेट गदारोळात मंजूर

## माळीवाडा वेस, रक्तपेढी, पाणीटंचाई व कचरा डेपोवरून सभागृहात जोरदार वाद

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर महानगरपालिकेचे बजेट शनिवारी अखेर गदारोळाच्या वातावरणात मंजूर करण्यात आले. महासभेदरम्यान विविध मुद्द्यांवरून सत्ताधारी व विरोधी नगरसेवकांमध्ये तीव्र वादविवाद झाले. विशेषतः माळीवाडा वेस पाडण्याच्या मुद्द्यावर भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेतली, तर शिवसेनेचे गटनेते दत्तात्रय कावरे आणि माजी महापौर सुरेखा कदम यांनी याला विरोध दर्शविला.

नगरसेवक संपत बारस्कर यांनी संबंधित वेस तात्काळ पाडण्याची मागणी करत तिला ऐतिहासिक महत्त्व नसल्याचे सांगितले. महापालिकेने कारवाई केली नाही तर आम्ही स्वतः ती पाडू, असा इशाराही त्यांनी दिला. कुमार वाकळे यांनी न्यायालयाच्या आदेशानंतरही कर्मचारी भरती का होत नाही, असा प्रश्न उपस्थित केला व पात्र उमेदवारांना तातडीने नियुक्ती देण्याची मागणी केली.

महापालिकेची रक्तपेढी बंद असल्याच्या मुद्द्यावर विकास जगताप यांनी प्रशासनावर टीका करत दरमहा सहा लाख रुपये खर्च होऊनही किती शिबिरे घेतली, असा सवाल केला. डॉ. शंकर शेडाळे यांनी गेल्या तीन महिन्यांपासून कर्मचारी नसल्याचे निदर्शनास आणले. यावर जगताप यांनी महापालिका सक्षम नसेल तर काम एखाद्या संस्थेकडे सोपवावे, अशी भूमिका मांडली. गणेश भोसले यांनी रक्तपेढी नवीन रुग्णालयात स्थलांतरित करण्याचा पर्याय सुचवला, तर अविनाश घुले यांनी यावर स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी केली.

कर्मचारी बदल्यांबाबतही बारस्कर यांनी प्रश्न उपस्थित करत कार्यक्षम कर्मचाऱ्यांना हटवून निष्क्रिय कर्मचाऱ्यांची नेमणूक केल्याचा आरोप केला. आयुक्त यशवंत डांगे यांनी यावर नियोजनासाठी फेररचना केल्याचे स्पष्टीकरण दिले. मयूर बांगरे यांनी मागासवर्गीय कल्याण निधीबाबत ८.४१ कोटी रुपये प्रत्यक्ष खर्च करण्याची मागणी केली. महिला नगरसेविका दिपाली बारस्कर, वर्षा सानप आणि सुनीता भिंगारदिवे यांनी शहरात महिला स्वच्छतागृहांची संख्या वाढवण्याची मागणी केली. अमोल येवले यांनी केडगाव भागातील पाणीटंचाईचा प्रश्न मांडत नवीन पाण्याच्या टाक्यांची गरज व्यक्त केली. सावेडी परिसरात महापालिकेचे रुग्णालय उभारण्याची मागणीही बारस्कर यांनी केली. माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी महापालिकेच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन डिजिटल सुविधांसाठी अधिक निधी देण्याचे आवाहन केले. दरम्यान, शहराच्या मध्यवर्ती प्रोफेसर कॉलनी चौकातील महापालिकेचे कचरा डेपो तातडीने हलविण्याची मागणी नगरसेविका सुनिता कुलकर्णी, सोनाबाई शिंदे तसेच नगरसेवक मनोज दुल्लम आणि करण कराळे यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे केली. नाट्यगृहाशेजारी असलेल्या या डेपोमुळे



परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. याच भागात नुकताच छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आल्याने नागरिकांची वर्दळ वाढली असून, डेपो तातडीने अन्यत्र हलविण्याची मागणी पुन्हा जोर धरत आहे.

SPOT NEWS

## बाबुजी आव्हाड यांच्या जयंतीनिमित्त पाथर्डीत "Beginning to End' पुस्तकाचे प्रकाशन

● **पाथर्डी । वीरभूमी –**

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक तथा माजी आमदार ना. ग. उर्फ बाबुजी आव्हाड यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. जी. पी. ढाकणे लिखित "Beginning to End' या पुस्तकाचे प्रकाशन मोठ्या उत्साहात करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अभय आव्हाड हे असणार असून, महाराष्ट्र साहित्य परिषद पाथर्डी शाखेचे अध्यक्ष अविनाश मंत्री हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यामध्ये ड. सुरेशराव आव्हाड (उपाध्यक्ष, पाथर्डी विद्या प्रसारक मंडळ), सुनील गोसावी (सचिव, शब्दगंध साहित्यिक परिषद), राजेंद्र उदागे (अध्यक्ष, शब्दगंध साहित्यिक परिषद), प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, शरद मेढे आणि श्रीमती अनुजा कुलकर्णी यांचा समावेश आहे.डॉ. जी. पी. ढाकणे हे बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचे माजी प्राचार्य असून त्यांनी साहित्य क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या "Beginning to End' या पुस्तकामध्ये जीवनप्रवास, अनुभव आणि विविध भावविश्वाचे प्रभावी चित्रण करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमानिमित्त सर्व विश्वस्त, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. बाबुजी आव्हाड यांच्या जयंतीनिमित्त हा उपक्रम आयोजित करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात येणार असून, साहित्यिक चळवळीला चालना देण्याचा प्रयत्न असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## पिंपळवाडी येथे नारायणगिरी महाराज पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन


● **कोपरगाव । वीरभूमी–**




राहता तालुक्यातील पिंपळवाडी येथे भगवान श्री सोमेश्वर संस्थांच्या वतीने ब्रह्मलीन गुरुवर्य नारायणगिरीजी महाराज यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह व गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थांचे अध्यक्ष ह भ प मधुसूदनगिरी महाराज यांनी दिली आहे. रविवार दिनांक २९/३/२०२६ ते गुरुवार दिनांक १/४/२०२६ पर्यंत सप्ताह काळात दररोज काकडा, गुरुचरित्र पारायण, हरिपाठ व रात्री सात ते नऊ वाजता हभप. रामभाऊ महाराज, हभप नित्यानंद महाराज, हभप संदिपान महाराज, हभप दत्तगिरी महाराज आदींचे हरिकीर्तन होणार असून त्यानंतर दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दिनांक २/४/२०२६ रोजी सकाळी ११वाजता हिंदू धर्म रक्षक महंत रामगिरीजी महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे तरी राहता व कोपरगाव तालुक्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ज्ञानामृत व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी आवाहन ह भ प मधुसूदन गिरी महाराज यांनी केले आहे.

## संजय देशमुख यांचे निधन

● **अकोले । वीरभूमी –**



तालुक्यातील सुगाव बुद्रुक येथील अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सेवेत असणारे संजय दौलतराव देशमुख यांचे वयाच्या ५८ व्या वर्षी अल्पशा आजाराने बुधवारी दुपारी निधन झाले. संगमनेर येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांची प्राण ज्योत मालवली. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, दोन बहिणी, दोन आत्या असा मोठा परिवार असून त्याच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या सुगाव बुद्रुक येथील निवासस्थानी नातेवाईक, मित्र परिवार यांनी मोठी गर्दी केली होती.कमलताई देशमुख यांचे ते भाचे तर चित्रपट निर्माती अश्विनी दरेकर यांचे ते मामे भाऊ होत. मयत संजय देशमुख हे गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा बँकेत सेवेत होते. त्यांच्या निधनाबद्दल जिल्हा बँकेचे संचालक सीताराम गायकर, मधुकरराव नवले, अमित भांगरे यांनी शोक व्यक्त केला आहे.

# निघोज येथील एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणारा अट्टल गुन्हेगार अटकेत

### पारनेर पोलिसांची कारवाई; परराज्यातील आरोपीकडून इतर गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता

● **पारनेर । वीरभूमी –**



निघोज (ता. पारनेर) येथील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएम मशीनची तोडफोड करून चोरीचा प्रयत्न करणाऱ्या परराज्यातील अट्टल गुन्हेगाराला अटक करण्यात पारनेर पोलिसांना यश आले आहे. संदीप भजन सिंग (वय २२, मूळ रा. पंजाब) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

दि. २२ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे ३:०७ वाजता निघोज येथील एसबीआयच्या एटीएम केंद्रात एका अज्ञात व्यक्तीने चेहरा झाकून प्रवेश केला होता. त्याने लोखंडी हत्यारांच्या साहाय्याने एटीएम मशीन फोडून रोकड लंपास करण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी संकेत चंद्रशेखर वैद्य (वय ४०, रा. नाशिक) यांनी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नगर ग्रामीण विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत तपासाच्या सूचना दिल्या. पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन खंडागळे व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

तपासादरम्यान संदीप भजन सिंग (मूळ रा. फतेहगड, जि. फिरोजपूर, पंजाब; सध्या रा. निघोज) यानेच हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून त्याला शिरूर येथून ताब्यात घेतले.

हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस पथकातील शिवाजी कडूस, अमोल धामणे, कल्याण लगड, गणेश डोंगरे, सागर वाघ, विजय जाधव, सागर साबळे आणि प्रकाश बोबडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपीकडून जिल्ह्यातील तसेच राज्यातील इतर एटीएम चोरीच्या गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## गॅस टंचाईवर उपाय म्हणून इलेक्ट्रिक शेगडी द्यावी : जे. डी. आंबरे

### ५० टक्के वीज बिल माफी; रॉकेल वितरण अशक्य

● **अकोले । वीरभूमी –**

सध्याच्या गॅस टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने ग्राहकांना इलेक्ट्रिक शेगडी उपलब्ध करून द्यावी व त्यावरील वीज बिलात ५० टक्के सवलत द्यावी, अशी मागणी माजी रॉकेल घाऊक विक्रेते जे. डी. आंबरे (पा.) यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

दि. २७ मार्च २०२६ रोजी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी बोलावलेल्या अर्धघाऊक व घाऊक रॉकेल विक्रेत्यांच्या बैठकीस अनुपस्थित राहण्याचे कारण स्पष्ट करताना आंबरे यांनी आपले मत मांडले.

त्यांनी निवेदनात नमूद केले की, शासन सध्या रॉकेल वितरणाची व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात सुरू करत आहे. मात्र ही व्यवस्था युद्धजन्य परिस्थिती संपल्यानंतर बंद होण्याची शक्यता आहे. सध्या स्वतःचे वय ७९ वर्ष असल्याने ही व्यवस्था सांभाळणे शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांची मुले इतर व्यवसायात असल्याने त्यांना यात सहभागी होता येणार नाही.

आंबरे यांनी नमूद केले की, सध्या सुमारे ५० टक्के घाऊक व अर्धघाऊक विक्रेते निधन पावले असून उर्वरितांकडे आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. अंडरग्राऊंड टाक्या, पंप व टँकर यांसारखी साधने अस्तित्वात नाहीत. शासनाने रॉकेल पुरवठा केला तरी किरकोळ विक्रेत्यांकडे भांडवल व साठवणूक व्यवस्था उपलब्ध नाही. अनेक रिटेलर व्यवसायातून बाहेर पडले असून उर्वरितांकडेही तात्पुरत्या स्वरूपात व्यवसाय करण्याची तयारी नाही.

तसेच सध्याच्या परिस्थितीत नागरिकांकडे स्वयंपाकासाठी स्टोव्ह किंवा पर्यायी साधने उपलब्ध नसून ती तातडीने उपलब्ध करणेही कठीण आहे, असे त्यांनी नमूद केले.

या सर्व बाबींचा विचार करता रॉकेल वितरण व्यवस्था सध्याच्या स्थितीत प्रभावीपणे राबविणे अशक्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्यामुळे शासनाने पर्यायी उपाय म्हणून ग्राहकांना इलेक्ट्रिक शेगडी देऊन वीज बिलात ५० टक्के सवलत दिल्यास गॅस टंचाईतून नागरिकांची मोठ्या प्रमाणात सुटका होऊ शकते, असे त्यांनी सुचविले.

## प्रा. गोकुळ सोनवणे यांना पीएच.डी. पदवी

● **अ.नगर । वीरभूमी–**

जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, अहिल्यानगर येथील प्रा. गोकुळ त्र्यंबक सोनवणे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने मार्केटिंग मॅनेजमेंट या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक कार्याला नवे बळ मिळाले असून परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रा. सोनवणे यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय ग्राहकांच्या वर्तनावर विपणन धोरणांचा प्रभाव : पुणे जिल्ह्यातील स्टार हॉटेल्सचा अभ्यास असा असून, त्यांनी आधुनिक विपणन तंत्रज्ञान, ग्राहकांची मानसिकता, सेवा क्षेत्रातील स्पर्धा आणि ग्राहक समाधान यांचा सखोल अभ्यास या प्रबंधातून मांडला आहे. विशेषतः हॉटेल उद्योगातील बदलते ट्रेंड, डिजिटल मार्केटिंगचा प्रभाव आणि ग्राहकांच्या अपेक्षांमध्ये झालेला बदल यांचे त्यांनी अभ्यासपूर्ण विश्लेषण केले आहे. त्यांच्या संशोधनामुळे हॉटेल आणि सेवा क्षेत्रातील व्यावसायिकांना ग्राहकाभिमुख धोरणे आखण्यास दिशा मिळणार आहे.

## राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत श्री भवानीमाता विद्यालयाचे घवघवीत यश



● **पाथर्डी । वीरभूमी–**

मराठी राजभाषा संवर्धन समितीतर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मराठी प्राविण्य परीक्षेत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे टाकळी मानूर येथील श्री भवानीमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने केंद्रस्तरावर घवघवीत यश संपादन केले.

इयत्ता पाचवीतील संस्कृती साईनाथ ठोंबरे व प्रणव संभाजी आंधळे यांनी प्रत्येकी २०२ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गर्जे धनश्री व शिरसाट ईश्वरी यांनी १९२ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. मासाळ अक्षदा (१८४ गुण) तृतीय, शिंदे कल्याणी व ढोले प्रतीक्षा (१७६ गुण) चतुर्थ, तर शेख यकीन कय्युम (१६६ गुण) पाचव्या क्रमांकावर राहिले.

इयत्ता सहावीमध्ये मोरे राजवीर (१५४ गुण) प्रथम, राजगुरू देव (१४२ गुण) द्वितीय, सरगर सार्थक (१३६ गुण) तृतीय, शिरसाट आदित्य (१२६ गुण) चतुर्थ आणि शेख आदिल (११८ गुण) पाचव्या क्रमांकावर राहिले.

इयत्ता सातवीमध्ये नागरे संस्कृती (२०२ गुण) प्रथम, गर्जे समृद्धी (१९६ गुण) द्वितीय, खेडकर सोनल (१९० गुण) तृतीय, चांगुने ईश्वरी (१८६ गुण) चतुर्थ, तर चव्हाण जान्हवी (१८० गुण) पाचव्या क्रमांकावर राहिली.

या सर्व विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. मराठी भाषेचे संवर्धन ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असून मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे, असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य देविदास सोनटक्के यांनी केले. मराठी भाषा जागतिक स्तरावर पोहोचण्यासाठी तिचा विकास व संवर्धन करणे आवश्यक असल्याचे आवाहनही त्यांनी केले.

या यशासाठी विद्यार्थ्यांना प्रकाश म्हमाणे, निलेश बहिर आणि श्याम गुंजकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यालयातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करून त्यांच्या मनामध्ये मराठी विषयाबद्दल जिज्ञासा, कुतूहल आणि आत्मविश्वास निर्माण केला.

## रामनवमी निमित्त खरवंडी कासार येथे विश्व हिंदू परिषदेचे रक्तदान शिबिर

● **पाथर्डी । वीरभूमी–**

श्रीरामनवमीच्या पवित्र पर्वानिमित्त खरवंडी येथे विश्व हिंदू परिषदेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्रीक्षेत्र भगवानगड परिसरात श्रीराम जन्मोत्सव विविध सामाजिक उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा करण्यात आला.

या उपक्रमासाठी विश्व हिंदू परिषदेचे प्रखंड मंत्री गणेश जवरे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या पुढाकारातून आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला प्रा. किरण केळगेंद्रे, संजय किर्तने, महारूद्र किर्तने, विनोद घुले, भाऊसाहेब अंदुरे, दादा जाधव, सुनिल जवरे, राहुल खेडकर, उद्धव किर्तने, महेश आव्हाड, दादासाहेब खेडकर, तुकाराम खेडकर, महादेव बटुळे, नितीन अंदुरे आदी मान्यवर उपस्थित होते.

ह.भ.प. संतोष खताळ महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी जनकल्याण रक्तपेढी, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात अनेकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. डॉ. ज्ञानेश्वर दराडे व डॉ. सौ. विद्या दराडे यांच्यासह अनेकांनी रक्तदानात सहभाग घेतला. विशेष म्हणजे, याच दिवशी दुर्गाष्टमी, श्री रामदास स्वामी जयंती आणि शिर्डी साईबाबा उत्सव असा पवित्र योग जुळून आल्याने कार्यक्रमाला अधिक धार्मिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. या उपक्रमामुळे समाजात सेवा, एकात्मता आणि मानवतेचा संदेश पोहोचला असून नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.




# मुस्लीम बांधवांचा इज्तेमा सुरेगाव येथे होणार

### इज्तेमाच्या मंडप उभारणीचा माजी आ.अशोकराव काळेंच्या हस्ते प्रारंभ

● **कोपरगाव । वीरभूमी–**

तालुक्यातील सुरेगाव, कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव–थडी आदी गावातील व परिसरातील मुस्लिम बांधवांच्या मागणीनुसार कोपरगाव–राहाता तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात येणारा इज्तेमा हा सुरेगाव–शहाजापूर परीसरात होणार आहे. या इज्तेमाच्या मंडप उभारणीच्या कामाचा शुभारंभ कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या हस्ते गुरुवार (दि.२६) रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

मुस्लिम बांधव एकाच ठिकाणी एकत्र येवून सामुहिक प्रार्थना करण्यासाठी व मुस्लीम बांधवांना धार्मिक प्रबोधनासाठी इज्तेमा आयोजन करण्यात येते. हा इज्तेमा आपल्या गावात व्हावा अशी अनेक गावातील मुस्लीम बांधवांची इच्छा असते. ही सुरेगाव, कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव–थडी आदी गावातील मुस्लीम बांधवांची इच्छा पूर्ण झाली असून कोपरगाव–राहाता तालुक्याच्या वतीने आयोजित करण्यात येणारा इज्तेमा हा सुरेगाव–शहाजापूर परीसरात मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या इज्तेमाच्या मंडप उभारणीचा शुभारंभ प्रसंगी माजी आमदार अशोकराव काळे यांनी सांगितले की, सुरेगाव,कोळपेवाडी, शहाजापूर, वेळापूर, कोळगाव–थडी आदी गावातील व परिसरातील मुस्लीम बांधवांची इच्छा आणि मागणी होती की, आपल्या भागात इज्तेमा व्हावा हि इच्छा पूर्ण होत असल्याचा अतिशय आनंद आहे. या धार्मिक कार्यासाठी सर्व धर्मियांनी सहकार्य करावे असे आवाहन केले.

समाजात एकता, शिस्त आणि बंधुभाव यावर मार्गदर्शनासह चांगले आचरण ठेवण्याचे वचन दिले जाते. म्हणूनच मुस्लीम बांधवांसाठी इज्तेमा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा मानला जातो. यावेळी इज्तेमा यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी मुस्लीम बांधवांनी अल्लाहची दुवा (प्रार्थना) केली. या धार्मिक कार्यक्रमासाठी सामाजिक बांधिलकी जोपासत इज्तेमाच्या धार्मिक कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल मुस्लीम बांधवांनी समाधान व्यक्त करून या इज्तेमा कार्यक्रमाला जास्तीत जास्त मुस्लीम बांधवांनी उपस्थित राहावे असे सांगितले.

यावेळी पंचायत समितीचे माजी उपसभापती वाल्मिकराव कोळपे, गौतम बँकेचे मा.व्हा.चेअरमन राजेंद्र ढोमसे, शहाजापूरचे उपसरपंच शरद वाबळे, कोळपेवाडीचे उपसरपंच सागर कोळपे,सुरेगावचे उपसरपंच दीपक कदम, कचरू कोळपे, सुखदेव कोळपे, भाऊसाहेब कोळपे, पोपटराव जुंधारे, पांडुरंग ढोमसे, पोलीस पाटील इंद्रभान ढोमसे, प्राचार्य नूर शेख, शिवाजी वर्पे, डॉ.इलियास सय्यद, ड.शापिक शेख,शकील पटेल, अल्ताफ पटेल, रज्जाक खाटिक, शब्बीर तांबोळी, शफिक शेख, सोयेब पटेल, मोहीज मणियार आदींसह मुस्लीम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते



वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

## SPOT NEWS



## भिंगार छावणीतील गौतम बुद्ध जॉगिंग पार्कसाठी पाण्याची सोय करा

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

भिंगार छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमधील वृक्षसंवर्धनासाठी हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने पाण्याची व्यवस्था करण्याचे निवेदन छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांना देण्यात आले आहे. पार्कमध्ये पाणीपुरवठा आणि शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांनी ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांची भेट घेऊन हे निवेदन दिले. यावेळी छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी आणि मनोनीत सदस्य वसंत राठोड उपस्थित होते. गेल्या २५ वर्षांपासून हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण व संवर्धनाचे उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. मात्र, पार्कमधील पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. सध्या शिवाजी पार्कमधील विहिरीवरून पाणीपुरवठा होत असला, तरी ते पाणी कमी प्रमाणात आणि लांब अंतरावरून येत असल्याने संपूर्ण पार्कला पुरेसे पाणी मिळत नाही. यापूर्वी सहा वर्षांपूर्वी उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यावर ग्रुपच्या सदस्यांनी स्वतः पुढाकार घेत टँकरद्वारे महिनाभर पाणीपुरवठा करून झाडे वाचवली होती. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्यातही झाडांच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. छावणी कार्यालयाजवळील सर्व्हे नंबर १८४ मधील लष्करी डेअरी फार्म परिसरात मोठी विहीर असून त्यामध्ये मुबलक पाणी उपलब्ध आहे. सध्या त्या विहिरीतील पाण्याचा वापर होत नसल्याने ते पाणी जॉगिंग पार्कसाठी उपलब्ध करून देण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यामुळे पार्कमधील पाणीटंचाई दूर होऊन वृक्षसंवर्धनाला मोठा हातभार लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्याची देखील मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने ब्रिगेडीयर पी. सुनिलकुमार यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह आणि रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित स्मरणिका देऊन गौरविण्यात आले. ब्रिगेडीयर सुनिलकुमार यांनी निवेदनाची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांना याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे लवकरच पार्कमधील पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बांधकाम कामगारांच्या हक्कांसाठी कर्जत येथे ८ एप्रिलला जिल्हाव्यापी आंदोलन

**अहिल्यानगर । वीरभूमी –**

बांधकाम क्षेत्रातील कामगारांना पेन्शन, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ तात्काळ मिळावा, यासाठी लोकशाही बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने कर्जत येथे जिल्हाव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. येत्या ८ एप्रिल रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत कर्जत तहसील कार्यालयासमोर हे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष शंकर भैलुमे यांनी दिली. संघटनेने प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून घेतले जाणारे अनेक निर्णय हे कामगारांच्या हिताचे नसून जाणीवपूर्वक अडचणी निर्माण करणारे आहेत. त्यामुळे कामगारांना योजनांचा लाभ मिळण्यात अडथळे येत आहेत. महाराष्ट्रातील सर्व बांधकाम कामगारांना तात्काळ पेन्शन योजना लागू करावी, कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी मागितली जाणारी अतिरिक्त कागदपत्रांची अट रद्द करावी, आवश्यक वस्तू संच वितरणात होत असलेली अनियमितता व फसवणूक तात्काळ थांबवावी, सर्व पात्र कामगारांना घरकुल योजना तातडीने मंजूर करावी, भविष्यात लॉकडाऊनसारखी परिस्थिती निर्माण झाल्यास प्रत्येक कामगाराला किमान १० हजार रुपयांची मदत देण्याचा शासन निर्णय काढावा, भांडी व अत्यावश्यक वस्तू संचांचे तालुका स्तरावर ऑनलाइन वितरण सुरू करावे, इतर राज्यांच्या धर्तीवर कामगारांच्या मुलांना लॅपटॉप योजना लागू करावी, मृत बांधकाम कामगारांचे प्रलंबित अर्ज तात्काळ मंजूर करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. या आंदोलनासाठी पुनम समुद्र, शालन मोहिरे, सुनिता अवचर, आशा माने, स्वप्नील जाधव, नमिता गुंड, स्वाती शिंदे, मिरा पारसे, गीतांजली अडसुळ, अशोक डांडर, रानी साळवे, आरमा शेख, समिना सय्यद, शाईन शेख, सानिया झारेकरी, दत्तात्रय लांडगे, कानिलाल भिसे, छाया सांगळे, वानू शेख, भाग्यश्री शिंदे, अब्बास तांबोळी, सुनिल जाधव, रमेश बरकटे, योगेश चव्हाण, सविता आरने, अमृत काळे, केशव दातीर, यास्मिन बागवान, चंद्रकांत चव्हाण, राजूभाई तांबोळी, शिल्पा म्हस्के, शवाना बागवान, फारुक शेख, वंदत्ता समुद्र, सारिका घोडके, राणी पिटेकर, कल्याणी थोरात, नितीन अवचार, अभिमन्यू पिटेकर, अनुप भैलुमे आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# श्रीरेणुकामाता देवस्थानात वासंतिक नवरात्रोत्सवाची सांगता

### पौर्णिमेपर्यंत पाच दिवस मातेला निद्रावास । नवरात्रोत्सव काळात भाविकांची उत्स्फूर्त उपस्थिती

**शेवगाव । वीरभूमी –**

श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुकामाता देवस्थानात शुक्रवारी (दि. २७) वासंतिक नवरात्रोत्सवाची सांगता मोठ्या उत्साहात पार पडली. श्री रेणुकामाता मल्टिस्टेटचे प्रवर्तक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांतनाना भालेराव तसेच असंख्य भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर रात्री साडेआठ वाजता महाआरती करून मातेला पौर्णिमेपर्यंत पाच दिवसांसाठी निद्रावास देण्यात आला.

गेल्या सप्ताहभर येथे भाविकांनी मोठ्या उत्साहात सकाळ-संध्याकाळ श्री रेणुकाआई साहेबांच्या दर्शनासाठी गर्दी केली. चैत्र शुद्ध नवमी निमित्त शुक्रवारी (दि. २७) सकाळी ६ वाजता मंदिर उघडण्यात आले. सकाळी ७ वाजता घटउत्थापन करण्यात आले. साडेआठ वाजता मातेला महाअभिषेक घालून होमाची पूर्णाहुती करण्यात आली. त्यानंतर साडेअकरा वाजता महा नैवेद्य व महाआरती झाली.



यानंतर देवीची छबीना मिरवणूक काढण्यात आली. दिवसभर देवस्थानात भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली. सायंकाळी साडेआठ वाजता आईसाहेबांना पौर्णिमेपर्यंत पाच दिवसांसाठी निद्रावास देण्यात आला.

उत्सव काळात बुधवारी (दि. २५) श्री शमी गणपती मंदिराचा कलशारोपण सोहळा तसेच गुरुवारी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व विधींचे पौरोहित्य वे.शा.सं. सच्चिदानंद देवा देशपांडे, तुषार देवा व देवस्थानच्या ब्रह्मवृंदांनी केले.

या उत्सवात श्री जोग महाराज संस्कार केंद्राचे प्रमुख राम महाराज झिंजूर्के, हनुमान टाकळी देवस्थानचे महंत रमेश अप्पा महाराज, माजी आ. बाळासाहेब मुरकुटे, ॲड. नितीन भालेराव, चंद्रकांत गळगट्टे, नागपूरचे सी.ए. पुरुषोत्तम बजाज, पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब बोठे, संदिप रोडे, महादेव दळे, हेमंत मिसाळ, राजेश जाधव, सी.ओ. चंद्रकांत चव्हाण, बबनराव भुसारी, अंबादास कळमकर, शंकरराव बेडके, रेणुका भक्तानुरागी मंगलताई भालेराव, जयंती भालेराव, योगिता भालेराव, कुंदाताई मुळे, शंकुतला गळगट्टे, श्रीमंत घुले, प्रा. जनार्दन लांडे पाटील, डॉ. अरविंद पोर्टफोडे, बाळासाहेब चौधरी, चंद्रकांत गायकवाड, रावसाहेब मरकड, रामनाथ रुईकर, शैलजा राऊळ, विजय कोळगे, रमेश लांडे, रामदास गोल्हार, एकनाथ कुसळकर, प्रज्ञेश भालेराव, गौरी, रुद्रांश व देवांश भालेराव, राजेंद्र नांगरे, आशुलिंग जगनाडे, कार्तिक पुनगंटीवार, राहुल वाघमारे आदींसह असंख्य भाविकांनी आईसाहेबांची पूजा बांधली.

## मनुष्य देह एक जंक्शन आहे येथून स्वर्गात जायचे की नरकात हे आपणच ठरवा : मधुसूदन गिरी महाराज

**कोपरगाव । वीरभूमी–**



नरदेह हा दुर्लभ आहे. मनुष्य जन्माला आल्यानंतर त्याला स्वर्गात जायचे की नरकात जायचे हे स्वातंत्र्य दिलेले आहे. जसं आंतरराष्ट्रीय विमानतळावरून जगात कुठेही प्रवास करता येतो तसेच मनुष्य देह हा एक जंक्शन आहे येथून स्वर्गात जायचे की नरकात हे आपणच ठरवावे असे प्रतिपादन ह भ प मधुसूदन गिरी महाराज यांनी केले आहे.

तालुक्यातील कान्हेगाव येथे सुशीलामाई पुंडलिक वाळुंज यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त आयोजित कीर्तन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी संत तुकाराम महाराजांचा इहलोकींचा हा देह, देव इच्छिताती पाहें हा अभंग निरूपणासाठी घेतला होता. ते पुढे विवेचन करताना म्हणाले की, देह हा केवळ भोगासाठी नसून, परमेश्वराने दिलेले एक पवित्र साधन आहे. जीवनाचा प्रत्येक क्षण हा ईश्वराच्या इच्छेनुसार आणि धर्ममार्गावर चालण्यासाठी वापरला गेला पाहिजे, मानवजन्म हा अत्यंत दुर्मिळ आणि भाग्यवान मानला जातो. हा जन्म मिळाल्यानंतर जर माणूस अहंकार, लोभ, मोह यांत अडकून राहिला, तर तो व्यर्थ जातो. मात्र, जो स्वतःला विठ्ठलाचा दास मानतो, त्याचे जीवन धन्य होते. स्वर्ग दूर नसून, आपल्या आचरणातून आणि भक्तीतून याच जगात निर्माण करता येतो .चांगले कर्म, प्रामाणिकपणा, दया, क्षमा आणि ईश्वरभक्ती यांच्या माध्यमातून माणूस स्वतःचे आणि समाजाचे जीवन उन्नत करू शकतो.

जे राज्यकर्ते व अधिकारी राज्य चालवतात ते एका भोंदू बाबाच्या नादी लागतात. तेंव्हा त्याचा समाजावर नकारात्मक परिणाम होतो. असे असेल तर कसे रामराज्य येणार? खरे संत ओळखता आले पाहिजे. गंडे, तोडे, अंगारे, धूपारे यांना वारकरी संप्रदाय धारा देत नाही.

यावेळी साथसंगत अरुणभैया पगारे, वसंत महाराज भाकरे, श्रीकृष्णा लकारे, प्रकाश गायकवाड, सांभारे महाराज, गडाख महाराज, विनायक टेके, दत्तात्रय सिनगर आदींनी केली.

यावेळी बबन वाळुंज, किरण वाळुंज, सुनील काजळे, राजेंद्र सांगळे, पत्रकार जनार्दन जगताप, अमोल गायकवाड, अमोल वाळुंज आदीसह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. समस्त वाळुंज परिवाराच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## पाथर्डीत जादूटोणा विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाला निवेदन

**पाथर्डी । वीरभूमी–**

राज्यात उघडकीस आलेल्या भोंदूगिरी आणि बुवाबाजीच्या घटनांमुळे सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर पाथर्डी तालुक्यात चालणाऱ्या अनिष्ट प्रथा, जादूटोणा आणि लोकांची फसवणूक करणाऱ्या भोंदू बाबांवर कडक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने आता आक्रमक पाऊल उचलले आहे. प्रशासनाने या गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण करावा, या मागणीसाठी आज निवासी नायब तहसीलदार किशोर सानप आणि पाथर्डी-शेवगाव विभागीय पोलीस उप अधीक्षक निरज राजगुरू यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देण्यात आले.



भोंदूगिरी, अंधश्रद्धा, चमत्कार या नावाखाली भोळ्या लोकांची आर्थिक फसवणूक करणे, त्यांचा मानसिक छळ करणे आणि महिलांचे शोषण करणे, हे गंभीर गुन्हे आहेत. 'अशोक खरात' सारखी भयंकर प्रकरणे पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासनाने सतर्क राहावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. चमत्काराचा दावा करून जे लोक फसवणूक करत आहेत, त्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर 'जादूटोणा विरोधी कायद्यानुसार' तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे निवेदनात म्हटले आहे.

यावेळी शशिकांत गायकवाड, वसंतराव बोर्डे, राजेंद्र सातपुते यांच्यासह साईनाथ बोर्डे, सुभाष गायकवाड, श्रीधर दौंडे, सिद्धार्थ बोर्डे, पंढरीनाथ कांजवणे, भीमा थोरात, म्हतारदेव ढाळे आदी उपस्थित होते.

## अकोले येथे रुद्रा फाउंडेशनच्या वतीने श्रीराम नवमी उत्सव साजरा

**अकोले । वीरभूमी–**

येथील रुद्रा फाउंडेशन च्या वतीने श्रीराम नवमी उत्सव गुरुवारी सायंकाळी अकोले शहरात मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची महाआरती करण्यात आली. यावेळी अकोले नगरपंचायतचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, राष्ट्रवादी किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंतराव मनकर, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे संचालक व काँग्रेसच्या किसान सेलचे जिल्हाध्यक्ष विक्रम नवले, उद्योजक बाळासाहेब आरोटे, रोटरी क्लबचे असिस्टंट गव्हर्नर अमोल वैद्य ,दूधगंगा पतसंस्थेचे चेअरमन डॉक्टर नितीन चासकर, व्हाईस चेअरमन चंद्रकांत नाईकवाडी, मल्टीस्टेटचे संचालक रमेश नाईकवाडी, ज्ञानवर्धिनी बालक मंदिरचे चेअरमन रामेश्वर रासने, सेवानिवृत्त मंडल अधिकारी शांताराम कोकणे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अक्षय आभाळे, पराग वाडगे, ॲड. अनिकेत चौधरी आदी विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

बसस्थानक परिसरात उभारलेल्या भव्य व्यासपीठावर प्रभू श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, बुवासाहेब नवले मल्टीस्टेटचे चेअरमन विक्रम नवले, राष्ट्रवादी काँग्रेसचे किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष एडवोकेट वसंतराव मनकर आदींची भाषणे झाली. सूत्रसंचालन फाउंडेशनचे संदीप शेनकर व भाऊसाहेब नाईकवाडी यांनी केले. रुद्रा फाउंडेशनचे अध्यक्ष तथा मनसेचे तालुकाध्यक्ष दत्ता नवले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सहकार्याने रामनवमी उत्सवाचे शाही आयोजन अकोले शहरात केले होते. फाउंडेशन च्या वतीने रामनवमी महोत्सव साजरा करण्याचे यंदाचे पाचवे वर्षे होते .या निमित्ताने फाउंडेशन च्या वतीने डीजे, अश्व, हत्ती आधी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रुद्रा फाउंडेशन




च्या सर्व सदस्यांनी डोक्यावर बांधलेले फेटे सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या सर्व कार्यक्रमांनी अकोलेकरांची मने जिंकली, हा कार्यक्रम पाहण्यासाठी आभाळ वृद्धांनी बस स्थानक परिसरात व शहरात एकच गर्दी केली होती. रात्री उशिरापर्यंत रुद्रा फाउंडेशन ची मिरवणूक सुरू होती पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या सहकाऱ्यांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# संजीवनी विद्यापीठ व एर्डोस रिसर्च यांच्यात सामंजस्य करार

### ऑक्सफर्ड विद्यापीठाशी संलग्न तज्ज्ञांकडून एआय संशोधनाला चालना । संजीवनीत एआय असिस्टंट रिसर्च सेंटर स्थापन होणार

**कोपरगाव । वीरभूमी–**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रातील नवे संशोधन व कौशल्ये आत्मसात करण्यासाठी संजीवनी विद्यापीठाने ऑक्सफर्ड विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापकांनी स्थापन केलेल्या एर्डोस रिसर्च संस्थेसोबत परस्पर सामंजस्य करार (एमओयू) केला.

एर्डोस रिसर्च संस्थेचे संशोधक व ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक प्रा. अजित जावकर आणि संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट श्री. अमित कोल्हे यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या करारामुळे संजीवनी विद्यापीठाने जागतिक पातळीवर एआय क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

या एमओयू अंतर्गत संजीवनीमध्ये एआय असिस्टंट रिसर्च सेंटर स्थापन होणार आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठालाही हेच अपेक्षित आहे, अशी प्रतिक्रिया प्रा. जावकर यांनी व्यक्त केली. उपस्थित प्राध्यापक व संशोधकांनी टाळ्यांच्या गजरात या कराराचे स्वागत केले.

संजीवनी विद्यापीठाच्या दृष्टीने आजचा दिवस एआय तंत्रज्ञानासोबत वाटचाल करण्यासाठी महत्त्वाचा ठरणार असल्याची प्रतिक्रिया संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाच्या सभागृहात हा करार संपन्न झाला. यावेळी संजीवनी विद्यापीठाचे व्हाइस चान्सलर डॉ. ए. जी. ठाकूर, स्ट्रॅटेजिक ॲडव्हायझर डॉ. शांतम शुक्ला, विविध संस्थांचे डायरेक्टर्स, प्राचार्य, डीन तसेच विभागप्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. जावकर म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जगभरातील विविध क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठाचा मूलभूत उद्देश संशोधनाच्या माध्यमातून दैनंदिन अडचणी सोडवणे हा आहे. संजीवनी विद्यापीठात संशोधनात्मक वातावरण निर्माण व्हावे यासाठी हा करार महत्त्वाचा ठरेल. एर्डोस रिसर्च संस्था ही ऑक्सफर्ड विद्यापीठातील एआय तज्ज्ञ प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने स्थापन केली आहे.




श्री. अमित कोल्हे म्हणाले की, संजीवनी विद्यापीठ हे संशोधनाधारित (रिसर्च ड्रिव्हन) विद्यापीठ व्हावे, ही संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांची संकल्पना असून, आजच्या करारामुळे ती साकार होण्यास मदत होईल.

> या सामंजस्य करारामुळे संजीवनी विद्यापीठातील पाच प्राध्यापक आणि अठरा विद्यार्थ्यांना ऑक्सफर्ड विद्यापीठातील एर्डोस रिसर्च संस्थेत तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच संशोधन प्रकल्प तयार करण्याची व ऑक्सफर्डला जाण्याची संधी उपलब्ध होणार आहे.
>
> – **प्रा. अजित जावकर** (एर्डोस रिसर्च संस्था)

संजीवनी शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे म्हणाले की, या करारामुळे संजीवनी विद्यापीठात नव्या अध्यायाची सुरुवात झाली असून आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

> भारतामध्ये सुमारे १२०० विद्यापीठे आहेत. मात्र, संजीवनीसारख्या ग्रामीण भागातील विद्यापीठाला एर्डोस रिसर्च संस्थेसोबत करार करण्याची संधी मिळणे ही मोठी उपलब्धी आहे. यामुळे संजीवनी विद्यापीठ जागतिक पातळीवर पोहोचले असून ग्रामीण विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञानाचे कौशल्य व नवे संशोधन आत्मसात करण्याची संधी मिळेल.
>
> – **अमित कोल्हे**, प्रेसिडेंट, संजीवनी विद्यापीठ

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजीवनी इंटरनॅशनल रिलेशन्स विभागाचे डीन डॉ. महेंद्र गवळी यांनी केले, तर स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या डीन डॉ. कविता राणी यांनी आभार मानले.

# कोपरगावात राष्ट्रीय ई-परिषद; संशोधन व नवोपक्रमावर प्रभावी मंथन

## उच्च शिक्षणातून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल । देशभरातील संशोधकांचा उत्स्फूर्त सहभाग

**● कोपरगाव । वीरभूमी –**

उच्च शिक्षण क्षेत्रात संशोधन, नवोपक्रम, स्टार्टअप्स आणि बौद्धिक संपदा (IPR) यांना चालना देणारी Role of Higher Education in Research, Innovation, Startups IPR (RHERISI-2026) ही एकदिवसीय राष्ट्रीय ई-परिषद कोपरगाव येथील श्री सदगुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स महाविद्यालयात ऑनलाइन पद्धतीने उत्साहात पार पडली.

रयत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत वाणिज्य, भूगोल, राज्यशास्त्र, बी.बी.ए. विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इनोव्हेशन फाउंडेशन, हडपसर (पुणे) तसेच चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांचे सहकार्य लाभले.

परिषदेचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी केले. त्यांनी संशोधन, नवोपक्रम, स्टार्टअप्स व बौद्धिक संपदेचे महत्त्व अधोरेखित केले. उद्घाटन सत्रातील प्रमुख पाहुण्यांचा परिचय उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत यांनी करून दिला.

उद्घाटक म्हणून यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथील माजी प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत नाविन्यपूर्ण व प्रात्यक्षिक शिक्षण स्वीकारून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले.


अतिथी सत्रात श्रीकांत कुंदेन (लक्ष्मीबाई भाऊराव पाटील इनोव्हेशन फाउंडेशन) यांनी उद्योजकतेतील संधी व आव्हाने यावर मार्गदर्शन केले. गिरीजानंदा चौधरी युनिव्हर्सिटी, आसाम येथील डॉ. गौर गोपाल बनिक यांनी विकसित भारत २०४७ या संकल्पनेवर विचार मांडले. लायडेनफ्रॉस्ट इनोव्हेशन्स प्रा. लि., पुणे येथील श्री. आशुतोष प्रचंड यांनी शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी नावीन्य व बौद्धिक संपदा अधिकार या विषयावर मार्गदर्शन केले.

संशोधन लेख सादरीकरण सत्राचे अध्यक्षपद धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा येथील डॉ. राजशेखर निलोलू यांनी भूषविले. त्यांनी संशोधकांना मार्गदर्शन केले.

समारोप सत्रात श्री. आदिनाथ दामले यांनी भारतातील नवोपक्रम, उद्योजकता व पेटंटचे महत्त्व स्पष्ट करून पेटंट नोंदणी प्रक्रियेविषयी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूरचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी संशोधन, नवोपक्रम व उद्योजकतेचा समन्वय साधण्याची गरज अधोरेखित केली.

परिषदेचा अहवाल डॉ. अर्जुन भागवत यांनी सादर केला, तर आभार प्रदर्शन प्रा. पूजा गव्हाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. चैताली वाघ व प्रा. प्रतीक्षा संवत्सरकर यांनी केले.

परिषदेच्या यशासाठी डॉ. चंद्रभान चौधरी, डॉ. देविदास रणधीर, प्रा. तानसेन रणदिवे, प्रा. दिलीप भोये यांच्यासह विविध विभागातील प्राध्यापकांचे सहकार्य लाभले. तांत्रिक सहाय्य श्री. गणेश जगताप यांनी केले. तसेच डॉ. बंडेराव तऱ्हाळ, डॉ. घनश्याम भगत, डॉ. निलेश मालपुरे व श्री. सुनील गोसावी यांनीही मोलाचे योगदान दिले.



या राष्ट्रीय ई-परिषदेस देशभरातील प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ७५ संशोधन लेख प्राप्त झाले असून ते 'बुलेटीन ऑफ नेक्सस (USA)' या जर्नलमध्ये प्रकाशित होणार आहेत.

# स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक पाया भक्कम

## नगराध्यक्ष अभय आव्हाड । विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंतांचा सत्कार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

शालेय जीवनात विविध प्रकारच्या स्पर्धा परीक्षांना सामोरे गेल्याने विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा पाया भक्कम होतो, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले.

पार्थ विद्या प्रसारक मंडळ आयोजित सहाव्या विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ नुकताच मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आव्हाड बोलत होते.

पाथर्डीसारख्या ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उत्तुंग भरारी घेत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांद्वारे यश संपादन करून आपले जीवन समृद्ध केले आहे. विद्यार्थ्यांनी प्रचंड मेहनत घेऊन आपल्या तसेच आई-वडिलांच्या स्वप्नांची पूर्तता करावी, असे आवाहन त्यांनी केले.




तसेच पालकांनी आपल्या पाल्यांना जीवनातील जय-पराजय स्वीकारण्याची तयारी व्हावी यासाठी त्यांना खेळाच्या मैदानावर आणून विविध खेळांचे धडे द्यावेत व सतत सकारात्मक समुपदेशन करावे, असेही त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यात प्रज्ञाशोध परीक्षेबरोबरच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

यावेळी मुख्याध्यापक एकनाथ ढोले, मुख्याध्यापिका नंदा तुपे व सुनिता नेहुल यांनी परीक्षेचे नियोजन व आयोजन उत्कृष्ट व पारदर्शक पद्धतीने केल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले. तसेच हे उपक्रम पाथर्डी तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या.

कार्यक्रमास जि.प. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा तुपे, रत्नप्रभा महांडुळे, एकनाथ ढोले, सीमा निकाळजे, पुष्पा खेडकर, दीपक बांगर, केंद्रप्रमुख सोपान डांगे, प्राचार्य डॉ. बी. ए. चौरे, मुख्याध्यापक शरद मेढे, परीक्षा प्रमुख ज्ञानेश्वर गायके, अनुजा कुलकर्णी, संपत घारे, मार्गदर्शक शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विवेकानंद प्रज्ञाशोध परीक्षा इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाते. या स्पर्धेत ग्रामीण विभागातून पहिल्या पाच तर शहरी विभागातून पहिल्या सात विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार केली जाते. तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत निवड झालेल्या एकूण ७२ विद्यार्थ्यांना गौरवचिन्ह, प्रमाणपत्र, रोख पारितोषिक व शैक्षणिक साहित्य मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. तसेच पाथर्डी तालुक्यातील २७ सहभागी शाळांचा सन्मान करण्यात आला.

गुणवंत विद्यार्थी आराध्या कुलट, अभिषेक लकडे, श्रीतेज नजन व अथर्व गर्जे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके यांनी केले, सूत्रसंचालन अनुजा कुलकर्णी यांनी केले, तर आभार जयश्री एकशिंगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मनीषा गायके, ज्योती हम्पे, राधिका सरोदे, आशा बांदल, कीर्ती दगडखैर, विद्या घोडके, संदीप धायतडक, विठ्ठल धस, ऋषिकेश मुळे, योगेश इधाटे, योगेश सपकाळ, बाळू हंडाळ, आजिनाथ शिरसाट, आदिनाथ फाजगे व कैलास भोसले यांनी परिश्रम घेतले.

# श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे वासंतीक नवरात्रोत्सवाची होमहवन व कुमारिका पुजनाने सांगता

**● पाथर्डी । वीरभूमी –**

श्रीक्षेत्र मोहटादेवीगड येथे वासंतीक नवरात्र महोत्सव सांगता देवस्थानचे विश्वस्त शशिकांत दहिफळे, शुभम दहिफळे, अ‍ॅड. श्रीमती ऋतीका कराळे यांचे हस्ते होमवहनाचा कार्यक्रमासह वासंतीक नवरात्राची सांगता झाली.

वासंतीक नवरात्र महोत्सवामध्ये शांतीपाठ, महासंकल्प, पुण्याहवाचन, चडीयाग हवन, चौसष्ठ योगीनी दशमहाविद्या, अष्टभैरव इ. देवदेतांसह, अभिषेकासह षोडशोपचार, कुमारिका पुजन केले. वासंतीक नवरात्र महोत्सव सांगता व होमहवन कार्यक्रम असल्यामुळे पहाटेपासुन भावीकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केलेली होती. वासंतीक नवरात्रास चैत्र नवरात्र असेही म्हणतात, हे हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे पर्व मानले जाते. वासंतीक नवरात्र हे आत्मशुद्धी आणि नवीन सकल्पांचे प्रतीक मानले जाते. सकल भारतवासीय देवीभक्तांचे उत्तम



आरोग्य व धनधान्य, सुख समृध्दी प्राप्त व्हावी असा महासंकल्प करुन प्रार्थना करण्यात आली.

होमहवन कार्यक्रमास देवस्थानचे विश्वस्त ड विक्रम वाडेकर, श्री बाळूशेट लाहोटी. देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, सौ. लता दहिफळे, सौ. योगीता दहिफळे, सौ. कावेरी लाहोटी, सौ. पूजा वाडेकर, संतोष शर्मा, प्रसाद कुलट, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे तसेच कर्मचारी, ग्रामस्थ व भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे पौरोहित्य वे. नारायण देवा सुलाखे, वे. भुषणदेवा, वे. निखील सुलाखे, महेश झेंड,

विशाल किडे, शुभम जोशी, सिध्देश्वर रामदासी, विशाल सुलाखे, भगवान जोशी यांनी केले. यावेळी पिंपरी चिंचवड किवले येथील उद्योजक व देवीभक्त चंद्रशेखर कातळे नगरसेवीका सौ. रेश्मा बापुजी कातळे परिवाराच्या वतीने मोहटे येथील रेणुका विद्यालयातील विद्यार्थीनींना वस्त्रदान , कुमारिका पूजन व अनदान करणेत आले.

# गरीबांच्या घराला मिळणार कायदेशीर छत : शासनाचा ऐतिहासिक निर्णय : माजी आ. स्नेहलताताई कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी –**

मुंबई शहर आणि उपनगर जिल्हा वगळता राज्यातील शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्यातील लाखो गरीब आणि गरजू कुटुंबांचा निवासस्थानाचा प्रश्न सोडविण्यासाठी २०११ पर्यंत झालेली केवळ निवासासाठी अस्तित्वात असलेली अतिक्रमणे या निर्णयानुसार नियमित करण्यात येणार आहेत.यामुळे कोपरगांव मतदारसंघातील या निर्णयाच्या अखत्यारीत येणारे जागांचे प्रश्न निकाली निघण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.या निर्णयाबद्दल मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानले आहे.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचा निर्णय घेतला असून भारताचा नागरिक नसलेल्या व्यक्तीचे अतिक्रमण नियमित होणार नाही, याची दक्षता संबंधित धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्याने घ्यायची आहे. या आदेशानुसार, ५०० चौरस फुटांपर्यंतचे निवासी अतिक्रमण पूर्णपणे विनामूल्य नियमित करण्यात येणार आहे. तर त्यापेक्षा अधिक असलेल्या क्षेत्रासाठी सध्याच्या बाजारमुल्याच्या केवळ दहा टक्के रक्कम कब्जे हक्काची रक्कम म्हणून आकारली जाणार आहे.

नदीपात्र, नाले, गायरान, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळण्याचे मैदान किंवा शाळा किंवा रुग्णालयासाठी आरक्षित जमिनींवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. मात्र अशा अतिक्रमित कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजनेतून पर्यायी घरे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

या योजनेच्या अंमलबजावणी साठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याने वेगवेगळ्या शासन मान्यतेची गरज लागणार नाही. या समित्याच निर्णय घेतील त्यामुळे कोपरगाव शहरासह ग्रामीण भागातीलही नागरिकांना या निर्णयाने फायदा होणार असल्याचे कोल्हे म्हणाल्या आहेत.

कोपरगाव नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचारावेळी मुख्यमंत्र्यांनी व महसूलमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या विश्वासानुसार हा निर्णय आता आगामी काळात अतिशय महत्वाचा ठरणार आहे.

# त्या मृतदेहाची अजूनही ओळख पटेना

## पोलिसांच्या तपासाला वेग । खुन्यापर्यंत पोहचण्यासाठी विविध पथके रवाना

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शुक्रवार दि. २७ रोजी कासार पिंपळगाव येथील बंधाऱ्याच्या पाण्यात गोणीत बांधलेला महिलेचा मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी तपासाचा वेग वाढवला होता. मृतदेहाची ओळख दुसऱ्या दिवशीही पटली नाही मात्र ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी हालचाली वाढविल्या असून नागापूर एमआयडीसी व शनि शिंगणापूर येथील दोघांनी पाथर्डी पोलिसांशी संपर्क केला असल्याची माहिती पोलिस निरीक्षक विलास पुजारी यांनी दिली.

कासार पिंपळगाव येथील बंधाऱ्यात गोणीत बांधलेला अज्ञात महिलेचा मृतदेह सापडल्यानंतर ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी वेग घेतला आहे. याबाबत जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यात मृत महिलेचे वर्णन पाठवून या वर्णनाचे कोणी मिसींग आहे का? याचा शोध घेतला असता नागापूर एमआयडीसी येथील एका जणाने मिळते-जुळते वर्णन असल्याचे सांगितले. मात्र साडीचा रंग मॅच होत नसल्याचे पोलिसांना सांगितले.




तर नेवासा तालुक्यातील शनि शिंगणापूर येथील वरील मयताचे वर्णनाला मिळते जुळती महिला दोन वर्षापासून बेपत्ता असल्याचे समजले. यानुसार तेथील नातेवाईक चौकशीसाठी शनिवारी रात्री उशिरा येणार असल्याची माहिती पोनि. विलास पुजारी यांनी दिली.

मृत महिलेची ओळख पटविण्याचे काम सध्या सुरू असून ओळख पटल्यानंतरच महिलेच्या खुनाचा उलगडा होणार आहे. यामुळे मयत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिस प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र दुसऱ्या दिवशीही ओळख पटली नाही. पोलिसांनी तपासाला वेग दिला असून तपासासाठी वेगवेगळी पथके तयार करुन ती ठिकठिकाणी पाठविण्यात आली आहेत.

मयत महिला ही सुमारे ५५ ते ६० वर्षे वायोगटातील असून तिचा रंग गोरा, उंची सुमारे १६० सेंमी आहे. तिचे केस काळे-पांढरे असून हातात चॉकलेटी-सोनेरी रंगाच्या काचेच्या बांगड्या, गळ्यात काळ्या-पिवळ्या मण्यांचे मंगळसूत्र आहे. उजव्या हातावर 'पाच आसरा' असे गोंदलेले असून अंगावर काळा ब्लाऊज व जांभळ्या रंगाची नऊवारी साडी परिधान केलेली आहे, तरी कोणाला याबाबत काही माहिती असल्यास तातडीने पाथर्डी पोलिस ठाण्यात संपर्क करावा, असे आवाहन पोनि. विलास पुजारी यांनी केले आहे.

# राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज स्मृतिदिनी मोफत पशू आरोग्य शिबिरात १४८ जनावरांची तपासणी

## जायंट्स ग्रुप व पशुसंवर्धन विभागाचा पुढाकार; २९ व्या वर्षीही उपक्रमाची परंपरा कायम

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या स्मृतिदिनानिमित्त शनिवारी (दि. २८ मार्च) जायंट्स ग्रुप ऑफ अहिल्यानगर आणि जिल्हा पशुसंवर्धन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत पशू आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण १४८ जनावरांची तपासणी करून आवश्यक लसीकरण व औषधोपचार करण्यात आले. विशेष म्हणजे, या उपक्रमाचे हे सलग २९ वे वर्ष ठरले.

नगर-पुणे महामार्गावरील जुने बस स्थानकाजवळील जिल्हा पशु सर्व चिकित्सालय येथे आयोजित शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते पार पडले. पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला.

यावेळी डॉ. उमेश पाटील यांनी पशुसेवा हीच ईश्वर सेवा असल्याचे सांगत मुक्या प्राण्यांप्रती दयाभाव ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असल्याचे नमूद केले. ते म्हणाले की, पशुपक्षी आपल्या भावना त्यांच्या वेगळ्या भाषेतून व्यक्त करतात. त्यांच्या वेदना समजून घेऊन पशुवैद्यक त्यांच्यावर विविध प्रकारचे उपचार करतात. त्यामुळे मुक्या प्राण्यांच्या दुःखाची जाणीव ठेवून संवेदनशीलतेने त्यांची काळजी घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी आपल्या मनोगतात आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी सांगितले की, आचार्यजींनी संपूर्ण आयुष्यभर क्षमा, शांती आणि संयम या तत्वांचा पुरस्कार केला. त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी आपण स्वतः या शहरात उपस्थित होतो, असे सांगत आचार्यजींनी प्राणीमात्रांवर दया करण्याचा संदेश दिला, त्यांच्या विचाराने हे पशुसेवेचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडतो. जायंट्ससारख्या सामाजिक संस्थांमुळे समाजाची जडणघडण होत असून, शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्यास मदत होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. मुकुंद राजळे यांनी जायंट्स ग्रुपतर्फे सातत्याने आयोजित केले जाणारे हे शिबिर अत्यंत दिशादर्शक असल्याचे नमूद केले. त्यांनी सांगितले की, जनावरांना बोलता येत नसल्यामुळे त्यांच्या रोगाचे निदान करणे हे अवघड असते. त्यामुळे अशा शिबिरांद्वारे त्यांच्या आरोग्याची तपासणी व उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जायंट्स वेल्फेअर फाउंडेशनचे स्पेशल कमिटी सदस्य संजय गुगळे यांनी सांगितले की, या शिबिराचे यंदा २९ वे वर्ष आहे. या उपक्रमात गाय, बैल, घोडे, कुत्रे, शेळ्या आणि मांजरांसाठी अँटी-रेबीज व धनुर्वात लसीकरण तसेच जंतनाशक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. अजय मेडिकलतर्फे सातत्याने औषध पुरवठा होत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

शिबिरात डॉ. मुकुंद राजळे, डॉ. ज्ञानेश्वर काळे, डॉ. दशरथ दिघे, डॉ. गणेश गव्हाणे, डॉ. निमसे, डॉ. कार्तिक शिंगटे, डॉ. सुधाकर गिते, मानस चिंताबर, आकाश चोपडे, डॉ. तुषार घुले, नीता गरकल, डॉ. प्रणव गडाख आणि कांचन कवडे यांनी तपासणी व उपचार केले.

स्मृतिदिनानिमित्त जायंट्स ग्रुपच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमही राबवण्यात आले. पांजरपोळ गोशाळेत जनावरांसाठी चारा वाटप करण्यात आले, व्हीआरडी येथील महानुभव आश्रमात वृक्षारोपण करण्यात आले, तसेच आनंदधाम येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, अशी माहिती अध्यक्ष राजेंद्र कटारिया यांनी दिली.



या शिबिरासाठी वीरबॅक निमल हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड व इंटास कंपनी यांनी मोफत औषधांचा पुरवठा केला. यावेळी कंपन्यांचे प्रतिनिधी ज्ञानेश्वर जाधव, समीर वाकोडे, प्रशांत मुठे आणि अविनाश घोलप यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष राजेंद्र कटारिया, सचिव अमित मुनोत, अजय मेडिकलचे संचालक दर्शन गुगळे, नूतन गुगळे, सौ. अनाक्षी गांधी, माजी अध्यक्ष अनिल गांधी, दीपक मुथा, पराग गांधी, सौ. अनिता मुथा, अभय मुथा, अमित धोका तसेच महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गांधी यांनी केले, तर आभार अमित मुनोत यांनी मानले.